# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२४**

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

## कोरोना चाचण्यांच्या संख्येत वाढ करण्याबाबत

**(१) ११३२९ (१०-०७-२०२०). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा),:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना रुग्णांची संख्या वाढू लागताच कोरोना चाचण्यांची संख्या कमी करण्यात येत असल्याचे माहे मे व जून २०२० मधील कोरोना रुग्णांच्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई व एमएमआर क्षेत्रात संसर्गाचा दर पनवेलमध्ये ४५%, भिवंडीमध्ये ४८%, मिरा भाईंदरमध्ये ४०% व मुंबईमध्ये २३.२२% इतके वाढले आहे, हे ही खरे आहे काय, शासनाने दिनांक १९ जून २०२० रोजी वा त्या सुमारास काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरोना चाचणीच्या संख्येत घट केल्यामुळे प्रत्यक्षात कोविडचा प्रसार वाढण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त सर्व वस्तुस्थिती मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी दिनांक २६ जून २०२० रोजी वा त्या सुमारास सविस्तर पत्र लिहून मा.मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, कोरोना चाचण्यांच्या संख्येत वाढ करण्याच्या दृष्टीने तसेच दिनांक १९ जून २०२० रोजीचे आदेश मागे घेण्यासंबंधी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (३०-१०-२०२३) :**(१) हे खरे नाही.

सदर कालावधीत कोरोना रुग्णसंख्या वाढली ही बाब खरी आहे. परंतू चाचण्यांची संख्या कमी करण्यात आलेली नाही. सदर कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेत २५७५५४ चाचण्यांमध्ये ७०५९७ रुग्ण, पनवेल महानगरपालिकेत ९०३२ चाचण्यांमध्ये २१३८ रुग्ण, भिवंडी महानगरपालिकेत ८९९२ चाचण्यांमध्ये २००९ रुग्ण व मिरा भाईंदर महानगरपालिकेत ९४०८ चाचण्यांमध्ये ३१६९ रुग्ण कोविड-१९ पॉझिटिव्ह आढळून आले आहेत.

(२) हे खरे नाही.

कोविड-१९ संसर्गाचा दर खालील प्रमाणे होता.

| मनपा | मे २०२० | जून, २०२० |
|---|---|---|
| मुंबई | २६.५१% | २८.२२% |
| पनवेल | १५.६०% | २७.८२% |
| भिवंडी | ३१.१०% | ३४.३२% |
| मिरा-भाईंदर | ३०.४४% | ३४.४८% |

(३) शासनाच्या दिनांक १२ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये कोविड-१९ या महामारीच्या परिस्थितीमध्ये मृतदेह हाताळण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यामध्ये कोरोना संशयित मृतदेहांची कोरोना चाचणी पूर्णत: बदं करण्यात यावी, असे आदेश दिलेले नाहीत.

(४) हे खरे नाही.

कोरोना चाचण्या कमी करण्याबाबत कुठलेही आदेश निर्गमित केलेले नाहीत.

(५) होय, हे खरे आहे.

(६) भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद (ICMR) यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार कोविड चाचण्यात करण्यात आल्या आहेत.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घरकुल योजनेतील लाभार्त्यांना मोफत वाळू देणेबाबत

**(२) ३३६४४ (०६-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारच्या सन २०२२ पर्यंत मोफत घरे या महत्वकांक्षी योजनेमध्ये वाळूच्या वाढलेल्या किंमतीमुळे अनेक घरांचे बांधकाम बंद आहे तसेच नव्याने मंजूर झालेल्या घरकुलांची कामे अद्यापपर्यंत चालू झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खर आहे काय,
(२) असल्यास, ज्या लाभार्थ्यांच्या घरांचे बांधकाम अर्धवट अवस्थेत आहे किंवा नव्याने मंजूर झालेल्या घरकुल लाभार्थ्यांना बांधकाम पूर्ण का करत नाही म्हणून शासनाकडून त्यांच्यावर कारवाई करण्याची धमकी दिली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, घरकुल धारक लाभार्थ्यांचा नाईलाज होऊन घरकुल बांधकामासाठी शासनाच्या धोरणानुसार पाच ब्रास मोफत वाळू देण्याचा निर्णय असणे परंतु आतापर्यंत तरी घरकुल लाभार्थ्यास वाळू मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाकडून वाळूचे लिलाव अल्पदरात केले जातात ती वाळू हजारो पट किंमतीमध्ये बाजारात विकली जाणे, तसेच महसूल व पोलीस पाठबळाने अवैद्य अशा प्रकारे वाळूचे उत्खनन केले जाते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले, त्यानुषंगाने संबंधित जबाबदार व दोषींवर कारवाई करणेसह घरकुलाना पाच ब्रास मोफत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. गिरीश महाजन (३१-०१-२०२४) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
दिनांक १९ एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानूसार दिनांक २०.१०.२०२३ पर्यंत घरकुलासाठी ७५९७ ब्रास वाळू वितरित केली आहे.
( ४) व (५) गौण खनिजाच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी महसूल,परिवहन व पोलिस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते.
राज्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी माहे ३० जून, २०२२ ते १५ ऑक्टोंबर, २०२३ या कालावधीत एकूण १०,५२६ प्रकरणात रु.४३५४९.६६/- लाख इतक्या दंडाची आकारणी करण्यात आली असून ११८० प्रकरणी गुन्हे दाखल करुन ६७८ आरोपींना अटक केली आहे. तसेच, या कालावधीत ४६५४ वाहने/यंत्रसामग्री जप्त करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद येथील जिल्हा शासकीय रुग्णालयातील ऑक्सिजन पुरवठा करणाऱ्या पाईपालईनच्या कामाबाबत

**(३) ३९११६ (२४-०४-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये कोरोनाचा प्रतिबंध करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयात ऑक्सिजन पुरवठा करणासाठी पाईप लाईनचे काम सुरु केले आहे, हे खरे अहे काय,
(२) असल्यास, उस्मानाबाद येथील जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या ऑक्सिजन पाईप लाईनच्या कामास केव्हा

वि.स. २२९ (3)

प्रशासकीय मान्यता मिळाली,

(३) असल्यास, प्रशासकिय मान्यता मिळाल्यानंतर कार्यारंभ आदेश कधी देण्यात आले व प्रत्यक्षात काम केव्हा सुरू झाले व केव्हा पूर्ण झाले,

(४) असल्यास,सदरहू पूर्ण झालेल्या कामाची प्रत्यक्ष चाचणी घेण्यात आली आहे काय,

(५) असल्यास,सदरहू काम पुर्ण झाले नसल्यास विलंब करण्या-या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (११-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) दि.१८.०८.२०२० रोजी नवीन इमारतीसाठी व दि.१२.०३.२०२१ रोजी जुन्या इमारतींसाठी प्रशासकीय मान्यता मिळाली.

(३) नवीन इमारतीसाठी कार्यारंभाचे आदेश दि.२९.०८.२०२० रोजी दिले होते. प्रत्यक्ष कामाची सुरुवात दि.३०.०८.२०२० रोजी सुरु होऊन काम दि.१७.०९.२०२० रोजी पूर्ण झाले.

(४) होय. उपरोक्त प्रमाणे काम पूर्ण झाल्यानंतर मे.आंबा स्टील मेटल उद्योग, फरीदाबाद यांच्याकडून पूर्ण झालेल्या कामाची प्रत्यक्ष चाचणी घेण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील सद्भावना जीवन रथ (VAN) ड्रायव्हर आणि इंधनाच्या प्रतीक्षेत असल्याबाबत

**(४) ३९१६२ (०१-०४-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यामध्ये कोरोना महामारीवर मात करण्यासाठी व लसीकरणाला चालना देऊन मोठया प्रमाणात लसीकरण व्हावे या अनुषंगाने जिल्हा परिषद नागपूर तर्फे सद्भभावना जीवन रथ ची सुरुवात दिनांक २० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली. हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर सद्भावना जीवन रथ उपलब्ध करण्यासाठी महापारेषण कंपनीने २५ कोटी रुपयांचा सी.एस.आर. निधी प्राथमिक आरोग्य केंद्रांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सद्भावना जीवन रथ (VAN) ड्रायव्हर आणि इंधनाच्या प्रतीक्षेत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, त्यानुसार उक्त जिल्हयातील सद्भावना जीवन रथ (VAN) सेवा सुरळीत होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०१-२०२४) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

नागपूर जिल्ह्यात लसीकरण अभियानांतर्गत विदर्भ सहायता सोसायटी व महापारेषण नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद, नागपूर यांना २६ सद्भावना रथ (VAN) प्राप्त झाले आहेत. या वाहनांकरिता इंधन व कंत्राटी वाहनचालकांच्या मानधनाकरिता जिल्हा खनिज प्रतिष्ठान, ना गपूर यांच्याकडून रु.१,१८,५६,०००/- इतका निधी दोन टप्प्यामध्ये जिल्हा परिषद,नागपूर यांना प्राप्त झाला व सदर निधीचे वाटप तालुक्यांना वाहनांच्या इंधनासाठी व वाहनचालकांच्या मानधनासाठी करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जावरला (ता.किनवट,जि.नांदेड) येथे सर्व सोयी सुविधा युक्त क्रीडा संकुल सुरु करण्याबाबत

**(५) ४०३३२ (१२-०४-२०२२). श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री**

वि.स. २२९ (4)

पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जावरला (ता.किनवट,जि.नांदेड) हे गाव कबड्डी या खेळास प्रोत्साहन देणारे ठिकाण असून राज्यपाल दत्तक असलेल्या या गावामध्ये एक कोटी खर्च करुन क्रीडा संकुल उभारण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या क्रीडा संकुलात कोणत्याही खेळाचे सराव साहित्य उपलब्ध नसल्याने वीज, पाण्याची सोय नाही, कोणतीही देखरेख नाही त्यामुळे खेळाचे मैदान उद्धाटनापूर्वीच जंगलशिवार झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन सोयी सुविधा उपलब्ध करुन क्रीडा संकुल सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (३१-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३)

राज्यपाल दत्तक गांव मौजे जावरला ता. किनवट जि. नांदेड येथे जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनांतर्गत नविन्यपुर्ण योजनेतून सन २०१६-१७ मध्ये ग्राम कीडा संकुल उभारण्यास मंजूरी मिळाली असून सन २०१८-२०१९ या वर्षात सुधारीत प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे. ग्राम क्रीडा संकुलाच्या अंदाजपत्रकास नाविन्यपुर्ण योजना आदिवासी उपयोजनेतंर्गत जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती नांदेड, यांनी रु.९९.६२ लक्षाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देऊन जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर यांना उपलब्ध करुन दिलेला आहे. ग्राम क्रीडा संकुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून सार्वजनिक बांधकाम विभाग,भोकर यांनी अद्याप सदर संकुलाचा ताबा ग्रामपंचायत कार्यालय, जावरला यांना दिला नसल्याने देखभाल, दुरुस्ती अभावी मैदानावर गवत व झाडे झुडपे उगवलेली आहेत. मौ. जावरला ग्रामपंचायत मार्फत ग्राम क्रीडा समिती स्थापन होताच देखभाल, दुरुस्ती व वापराकरिता या समितीस ग्राम क्रीडा संकुल हस्तांतरण करण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पूर्ण करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मागाठाणे (मुंबई उपनगर) येथील प्रभाग क्र.२५ या विभागात भव्य क्रीडा संकुल बांधण्याकरिता निधी मंजूर करण्याबाबत**

**(६) ४३४७३ (१२-०४-२०२२). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागाठाणे विधानसभा मतदार संघातील (मुंबई उपनगर) येथील प्रभाग क्र.२५ या विभागात भव्य क्रीडा संकुल बांधण्याकरिता निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (३१-०१-२०२४) :**(१) होय,

सदर निवेदन नगर विकास विभागास प्राप्त झालेले आहे.

(२) मागाठाणे विधानसभा मतदार संघातील (मुंबई उपनगर) प्रभाग क्र.२५ मधील जागा ही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अख्यारीतील आहे. सदर जागा तालुका क्रीडा संकुल समितीच्या नावे हस्तांतरित केल्यास महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा धोरणांतर्गत क्रीडा संकुल विकसित करता येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**नरडाणा (ता.शिंदखेडा, जि.धुळे) येथील ग्रामीण रूग्णाल इमारत मंजूर असूनही काम न झाल्याबाबत**

**(७) ४४७४२ (०७-१०-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरडाणा (ता.शिंदखेडा जि.धुळे) येथील ग्रामीण रूग्णालयाची इमारत १० वर्षापासून मंजूर असून केवळ जागेअभावी इमारत अद्याप उभी राहीली नसल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, नरडाणा ग्रामपंचायतीने प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारतीच्या जागेवरच ग्रामीण रूग्णालय उभारावे आणि जवळच्या गावठाण जागेवर कर्मचारी निवासस्थाने उभारण्याबाबत ग्रामसभा घेवून तसा ठराव करून शासनास पाठवूनही अद्यापी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर इमारतीचे बांधकाम सत्वर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०४-०१-२०२४) :**(१) होय.

(२) हे खरे नाही.

जागा उपलब्ध करुन घेण्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, धुळे यांचेस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा सरपंच ग्रामपंचायत यांचे नावे असल्याने सदरील जागा जिल्हा शल्य चिकित्सक, धुळे यांचे नावे करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. सदर जागा नावावर होताच बांधकामाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ तालुक्यातील ट्रामा केअर ग्रमीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(८) ४६९५४ (११-१०-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ तालुक्यातील ट्रामा केअर ग्रमीण रुग्णालय येथे सफाई कामगार, हेल्पर, ड्रायव्हर ही पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात येत असतात तथापि सद्यःस्थितीत या जागांसाठी कंत्राट निघाले नसल्यामुळे ही पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याचा परीणाम रुग्णालयातील दैनंदिन कामकाजावर तसेच तेथील डॉक्टर व नागरिकावर होत असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०५-०१-२०२४):**(१) हे अशंत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पदनिर्मितीच्या शासन निर्णयानुसार ट्रामा केअर ग्रामीण रुग्णालयातील सफाई कामगार व ड्रायव्हर ही पदे कंत्राटी पध्दतीने मंजूर आहे. परंतु हेल्पर हे पद मंजूर नाही.

(२) हे खरे नाही.

(३) ट्रामा केअर ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत उपसंचालक नाशिक कार्यालयाकडून मे.श्री.छत्रपती शिवाजी महाराज, नाशिक या संस्थेला कंत्राटी सेवांतर्गत मनुष्यबळ पुरविण्याबाबत दि.०७.०६.२०२३ रोजी कार्यादेश निर्गमित करण्यात आले आहेत व सप्टेंबर २०२३ पासून कंत्राटी कुशल /अकुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

( ४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय रुग्णालयांची क्षमता वाढविण्याबाबत**

**(९) ४७८२० (०९-११-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा**

**खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा रुग्णालये येथे आंतर व बाहय रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचा-यांची रिक्त पदे, अपुरा औषध पुरवठा, तंत्रज्ञानाचा अभाव इ. कारणांमुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे सर्वसामान्य रुग्णांना खासगी रुग्णालयांतून स्वखर्चाने उपचार करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे शासनाने या रुग्णालयांचा आढावा घेऊन तेथील गैरसोयी दूर करण्याबाबत तसेच या रुग्णालयांची क्षमता वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (११-०१-२०२४) :**(१) होय.

(२) व (३) नाही.

(४)

अ. शासन निर्णय दि. २८ जुलै, २०२३ अन्वये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेचे विस्तारीकरण करण्याबाबतचा असून (आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेत आरोग्य संरक्षण प्रती कुटुंब प्रती वर्ष रु. ५ लक्ष एवढे आहे तर महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेत आरोग्य संरक्षण प्रती कुटुंब प्रती वर्ष रु. १.५ लक्ष एवढे आहे. आता महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गतही आरोग्य संरक्षण प्रती कुटुंब प्रती वर्ष रु. ५ लक्ष एवढे करण्यात येत आहे.

ब. शासन निर्णय दि.२३ ऑगस्ट, २०२३ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली शासकिय रुग्णालयांमधील तपासणी व उपचार नि;शुल्क करण्यात आले आहेत.

क. शासन निर्णय दि. १८ जुलै, २०२३ अन्वये नव्याने स्थापन करण्यात आलेल्या आरोग्य संस्थाकरीता पदनिर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

ड. तसेच लोकप्रतिनिधी व इतर मान्यवरांकडून मागणी करण्यात आलेल्या आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्याबाबतचे निर्णय विशेष बाब म्हणून वेळोवेळी घेण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जागतिक आरोग्य सेवेच्या निकषानुसार रुग्ण खाटांचे निकष पूर्ण करणेबाबत

**(१०) ४९०३७ (११-१०-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक आरोग्य सेवेच्या निकषानुसार ४० लोकसंख्येमागे एक रुग्ण खाट असणे आवश्यक असताना राज्यात मात्र ४ हजार २६४ लोकांमध्ये एक रुग्ण खाट उपलब्ध असल्याचे आरोग्य सेवा संचालनालयाने दिलेल्या अहवालात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य महासत्ताक व Make In Maharashtra बनवित असताना आरोग्य सेवेबाबत मात्र आफ्रिकन देशांशी स्पर्धा करीत असल्याचे वास्तव समोर येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जागतिक आरोग्य सेवेच्या निकषानुसार ४० लोकसंख्येमागे एक रुग्ण खाट हा निकष पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (११-०१-२०२४) :**(१) नाही.

वि.स. २२९ (7)

(२) नाही.

(३) राष्ट्रीय आरोग्य धोरण (National Health Policy) २०१७ नुसार प्रती १००० लोकसंख्येमागे १ खाट असणे आवश्यक आहे.

तसेच प्रती १००० लोकसंख्येमागे २ खाट असण्याचे ध्येय इष्ट असावे, असे नमूद करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत रुग्णालयांमध्ये खाटांची संख्या प्रती १००० लोकसंख्येसाठी ०.३९ एवढी आहे.

तसेच प्रती १००० लोकसंख्येमागे २ खाट असण्याचे ध्येय इष्ट असण्याबाबतच्या निकषांची पुर्तता करण्याबाबत शासन प्रयत्नशिल असुन योग्य त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाच्या जमिनी ग्रामपंचायतीकडे निहित असल्याबाबत

**(११) ४९९३० (२०-०१-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ग्रामपंचायत कायद्यानुसार शासनाच्या जमिनी ग्रामपंयातीकडे निहित आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीवर मोठया प्रमाणात भूमाफियांनी अतिक्रमण करुन त्यांची बेकायदेशीर खरेदी विक्री करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानसुार जमिनीवर अतिक्रमण करुन त्यांची बेकायदेशीर खरेदी विक्री करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे,

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ५१ (१)च्या तरतुदीनुसार शासनाच्या मालकीच्या जमिनी राज्य शासनाला ग्रामपंचायतीकडे निहित करता येतात.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालयात रुग्णांची होणारी गैरसोय

**(१२) ५१२८० (२१-०१-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात व्हायरल इन्फेक्शनचे रुग्ण सर्वाधिक असून जिल्हा सामान्य रुग्णालयात हे रुग्ण उपचार घेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना सारख्या गंभीर आजाराचा प्रादूर्भाव अद्याप कमी झाला नसतांना रुग्णालयातील बाहय रुग्ण विभागासमोर (ओपीडी) नेहमीच गर्दी दिसत असून गर्दीचे नियंत्रण करण्याकरिता सुरक्षा रक्षक नसल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्या नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४)असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**डॉ. तानाजी सावंत (०४-०१-२०२३) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही,

वि.स. २२९ (४)

जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये २१ सुरक्षारक्षक कार्यरत असून, त्यामधील ३ सुरक्षारक्षक बाहय रुग्ण विभाग व वाहन पार्किग परिसरात कार्यरत आहेत.

(३) पुरेसे सुरक्षारक्षक असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राधानगरी व भुदरगड तालुक्यामध्ये मिनी एमआयडीसी प्रस्थापित करणेबाबत**

**(१३) ५६४९६ (२३-०५-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी व भुदरगड तालुक्यामध्ये मिनी एमआयडीसी प्रस्थापित करणे व आजरा येथील एमआयडीसीचे विस्तारीकरण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १७ मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार सविस्तर अहवाल सादर करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पुर्व) यांना दिनांक १० जून, २०२२ रोजीच्या पत्रान्वये सादर करुन कळविण्यात आले असुन त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (२३-०१-२०२४) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

प्रस्तावित कौलव (राधानगरी) औ. क्षेत्र मौजे कौलव येथील १५.४७ हे.आर क्षेत्रास मऔवि अधिनियम १९६१ चे प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) व आजरा औद्योगिक क्षेत्राकरीता मौजे आजरा येथील ७.०१ हे.आर, पारेवाडी येथील १०.७३ हे.आर असे एकूण १७.७४ हे.आर सरकारी क्षेत्रास मऔवि अधिनियम, १९६१ चे कलम २ खंड (ग) च्या तरतूदी लागू करणेस उच्चाधिकार समितीच्या १५७ व्या बैठकीत मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. MID Act १९६१ नुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) शहरालगत असणाऱ्या लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत हद्दीत भुयारी गटार बांधणेबाबत**

**(१४) ५७१७८ (२४-०४-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) शहरालगत असणाऱ्या लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत हद्दीतील शिवपार्वती नगर भागातील भुयारी गटार तुंबल्याने सभोवतालच्या परिसरात घाणीचे साम्राज्य पसरल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणी उघड्यावर सांडपाणी साचून डबके तयार होऊन डासांचे प्रमाण मोठया संख्येने वाढून परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उक्त ठिकाणी अनेकदा भुयारी गटार नव्याने बांधण्याची मागणी करूनही काही समाजविरोधी व्यक्तींमुळे तेथील स्थानिक प्रशासन हतबल झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुषंगाने उक्त भुयारी गटार त्वरित बांधून कार्यान्वित करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३१-०१-२०२४) :**(१) हे अंशत: खरे आहे,

(२) नाही, हे खरे नाही,

शिवपार्वती नगर परिसरातील ठिकाणी ग्रामपंचायती मार्फत साठलेल्या पाण्यावरती जंतुनाशक फवारणी नियमितपणे करण्यात येत आहे.

(३) शिवपार्वती नगरमध्ये भुयारी गटारीचे १५ वा वित्त आयोग अंतर्गत काम मंजूर केले असून कामाचे अंदाजपत्रक तयार

करून तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली आहे.काम करत असतांना नागरिकांनी बांधकामास अडथळा निर्माण केल्यामुळे गटारीचे काम अन्य मार्गाने (जवळ असलेल्या रस्त्याच्या कडेने) युद्ध पातळीवर सुरु असून तात्काळ सदरचे काम पूर्ण करण्यात येत आहे.

(४) जिल्हा परिषदेकडील स्वच्छता विभागामार्फत लक्ष्मी टाकळी येथे सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत रक्कम रु.५३,८३,१८०/-चे गटारीचे काम मंजूर केलेले आहे. त्यामुळे भविष्यात ग्रामपंचायतीचे सांडपाण्याचे प्रश्न उद्‌भवणार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्ग कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन विलंबाने होत असल्याबाबत**

**(१५) ५७१८२ (०२-०५-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आरोग्य विभागात कंत्राटी तत्वावर नेमलेल्या सुमारे ६५० वैद्यकीय अधिकाऱ्यांपासून ते सफाई कामगारांना दोन महिन्यांपासून वेतन मिळालेले नसल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच,धुळे जिल्हा रुग्णालयातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना गेल्या पाच महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन कोणत्याही कारणास्तव रोखण्यात येऊ नये असे शासनाचेच आदेश असताना जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून तांत्रिक बाबीचे कारण देउन वेतन रोखण्यात आल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, तदनुसार राज्यातील कंत्राटी व नियमित आरोग्य कर्मचाऱ्यांचे वेतन नियमितपणे होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबनाची कारणे काय ?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

नाशिक जिल्हयात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे माहे नोव्हेंबर २०२२ चे मानधन प्रलंबित होते. तथापि, माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०२२ चे मानधन माहे जानेवारी २०२३ मध्ये अदा करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे आहे.

माहे जुलै २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत केवळ बाहयस्त्रोतांव्दारे पुरविण्यात येणारे कुशल-अकुशल कर्मचारी व सुरक्षा रक्षक यांचे वेतन अनुदान उपलब्ध नसल्यामुळे प्रलंबित होते. त्यानंतर पुरसे अनुदान उपलब्ध झाल्याने कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मे, २०२३ अखेर वेतन अदा करण्यात आलेले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन दरमहा एक तारखेस अदा करणेबाबतच्या सुचना सर्व जिल्हास्तरावर निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तसेच धुळे जिल्हयाकरिता सदर कालावधीत अनुदान उपलब्ध नसल्याने कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करता आले नव्हते. तथापि, सहसंचालक (अर्थ व प्रशासन ), पुणे यांचेकडून अनुदानाची मागणी करून उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक यांचेमार्फत जिल्हा रूग्णालय, धुळे यांना माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये व त्यानंतर पुरेसे अनुदान उपलब्ध करण्यात येऊन कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मे २०२३ अखेर वेतन अदा करण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

**रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील कचऱ्याची वाढती समस्या लक्षात घेता तातडीने घंटागाडी ग्रामपंचायतींना उपलब्ध करून देणेबाबत**

**(१६) ५७२१६ (२४-०४-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील वाढते औद्योगिकरण व नागरिकांची संख्या पाहता ग्रामीण भागात घंटागाडीच्या कमतरतेमुळे कचरा उचलण्याची व कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची मोठी समस्या निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील ८०९ ग्रामपंचायतींपैकी १५४ ग्रामपंचायतींमध्ये घंटागाडयांची व्यवस्था असून ६५४ ग्रामपंचायतींमध्ये घंटा गाडयांची व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील कचऱ्याची वाढती समस्या लक्षात घेता तातडीने घंटागाडी ग्रामपंचायतींना उपलब्ध करून देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२२-०१-२०२४) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) सद्यस्थितीत, रायगड जिल्ह्यातील ८०९ ग्रामपंचायतीपैकी १७३ ग्रामपंचायतीमध्ये २१३ घंटागाडयांची व्यवस्था असून ६३६ ग्रामपंचायतीमध्ये घंटागाडयांची व्यवस्था नाही. तसेच जिथे घंटागाडी नाही त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार भाडयाने वाहन घेऊन कचरा संकलन व्यवस्थापन केले जाते.

अनेक ग्रामपंचायतींचे अल्प उत्पन्न असल्याने घंटागाडी खरेदी करणे व त्या वाहन चालकाचे पगार व इंधन खर्च परवडत नाही. तथापि, शासनाकडील विविध योजनांची सांगड घालून गाव तिथे घंटागाडी घेणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., रायगड यांनी जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील सुमरगडाच्या पायथ्याशी घेरारसाळगड गावची जानकरवाडीमध्ये रस्ता व पाणी या मुलभूत सुविधा पुरविणेबाबत**

**(१७) ५७३५६ (२४-०४-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील किल्ले सुमारगडच्या पायथ्याशी घेरारसाळगड गावची जानकरवाडी वसलेली असून स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही येथे रस्ता, पाणी, आरोग्य शिक्षण आदी मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घेरारसाळगड जानकरवाडी येथे असलेल्या पाण्याच्या स्त्रोतामार्फत नळपाणी योजना लागू करून पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यासाठी, वाडीसालदे ते घेरारसाळगड जानकरवाडी हा ८ कि.मी. लांबीचा रस्त्या तयार करण्यात यावा तसेच अनेक मुलभूत सोयीसुविधा विनाविलंब पुरविण्याबाबत येथील सामाजिक संस्थांनी व नागरिकांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती,खेड, तहसिलदार खेड यांचेकडे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर मागणीनुसार मुलभूत सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२३-०१-२०२४) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) खेड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) सुमारगडच्या पायथ्याशी घेरारसाळगड गावची जानकरवाडीमध्ये ४ ते ६ घरे असून अंदाजे लोकसंख्या २५ ते ३० आहे. सदर वाडीला प्राथमिक आरोग्य केंद्र तळे अंतर्गत मांडवे कडून आरोग्य सेवा दिली जात असून वाडीपासून १.०० कि.मी. वर किल्लाबौध्द शाळा सुरु आहे.

तसेच, जल जीवन मिशन अंतर्गत वाडीचा समावेश घेरसाळगड नळ पाणीपुरवठा योजनेत केला असून वाडीकडे जाणारा रस्ता योजना बाह्य स्वरुपाचा आहे.

सदर रस्त्याच्या दुरुस्तीकरीता रु.१८७.५० लक्ष निधी अपेक्षित असून लेखाशिर्ष २५१५ १२३३८ योजनेंतर्गत सदर ठिकाणी विकास कामे घेण्यास मा.लोकप्रतिनिधींना मुभा आहे. सबब, योजनेतील अटी व शर्तीनुसार त्यातून सदर ठिकाणी विकास कामे करणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय सेवेतील दिव्यांग कर्मचाऱ्याच्या बदल्या त्याच्या रहात्या ठिकाणाजवळ करणेबाबत**

**(१८) ५९३५१ (२८-०४-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय सेवेतील दिव्यांग कर्मचाऱ्याची बदली त्याच्या राहत्या ठिकाणाजवळ करण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक -दिव्यांग सुधारित शब्द क्रमांक १००४/ पत्र क्रमांक १८ /०४/१६-अ, मंत्रालय मुंबई, दिनांक १५-१२-२००४रोजी वितरीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय सेवेततील दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या बदल्या संदर्भात सहानुभुतीचा दृष्टिकोन ठेवून त्यांच्या राहत्या ठिकाणाजवळ बदली करण्याबाबत दिव्यांग सुधारित शब्द उक्त परीपत्रकाद्वारे आदेशित केले असूनही डॉक्टर कोमल चंद्रशेखर अगरवाल हया दिव्यांग ४४ टक्के समुदाय आरोग्य अधिकारी यांची बदली झाली नसल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ जून, २०२२ रोजीच्या पत्र नुसार मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती तसेच अकोला व जिल्हा आरोग्य अधिकारी,अमरावती,अकोला यांना लेखी स्वरुपात कळविले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, अकोला जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक २८३ / २०२२ दिनांक १८- ६-२०२२ रोजी मा. आरोग्यमंत्री यांना डॉक्टर कोमल चंद्रशेखर अगरवाल हया दिव्यांग ४४ टक्के समुदाय आरोग्य अधिकारी यांची प्राथमिक आरोग्य केंद्र शिराळा जिल्हा अमरावती येथून अकोला जिल्ह्यात तेल्हारा तालुका येथे बदली करणेबाबत विनंती केली असता मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना प्रस्ताव तपासून तात्काळ सादर करावा असे आदेश दिनांक२७/१२/ २०२२ रोजी दिले असूनही अद्याप पर्यंत दिव्यांग CHO पदावरील डॉक्टर कोमल चंद्रशेखर अग्रवाल यांची अद्याप पर्यंत बदली केली नसून त्याच्या सह असे अनेक कर्मचारी अधिकारी यांनी मागणी केली प्रमाणे आदेश होऊनही तयाबाबतचे आदेश आरोग्य विभागाकडून काढले गेले नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कायआहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) दिनांक ३१.०१.२०२३ रोजीचे निवेदन प्राप्त असून समुदाय आरोग्य अधिकारी हे पद राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कंत्राटी पद असून या पदावर कार्यरत अधिकारी यांची बदली करण्याचे कुठलेही धोरण नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माळेगाव (ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक) येथील शासकीय घरकुल योजनेत ऑनलाइन फेरफार केल्याबाबत**

**(१९) ६०१६१ (०२-०५-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळेगाव (ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक) येथील शासकीय घरकुल योजनेत ऑनलाइन फेरफार करून अनुसूचित जातीच्या पात्र लाभार्थी यादीत अनुसूचित जमातीचे लाभार्थी टाकण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली हे खेर आहे काय,

(२) असल्यास, माळेगाव येथे घरकुल योजनेसाठी पात्र लाभार्थीची यादी घोषित करण्यात आली परंतु संबंधित डेटा ऑपरेटर्सनी मर्जीतील लोकांना लाभ दिल्याचा आरोपही करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२५-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) ग्रामपंचायत माळेगाव येथील कुटूंबांचे सर्व्हेक्षण आवास प्लस (Awaas Plus) या मोबाईल ॲपद्वारे करताना ग्रामपंचायतींचे डाटा एन्ट्री ऑपरेटर यांचेकडून आडनावातील साधर्म्यामुळे नजरचुकीने १० अनुसूचित जमातीच्या (ST) लाभार्थ्यांची माहिती भरताना संवर्गात बदल होऊन अनुसूचित जाती (SC) या संवर्गात भरण्यात आल्यामुळे अनुसूचित जमातीच्या (ST) या संवर्गातील १० लाभार्थी हे अनुसूचित जाती (SC) या संवर्गाच्या यादीत समाविष्ट झालेले आहेत.

ऑनलाईन टॅब बंद झाल्यानंतर सदर बाब निदर्शनास आल्यामुळे जिल्हा स्तरावर सदर लाभार्थ्यांच्या संवर्गात बदल करता आलेला नाही. सदर १० लाभार्थ्यांपैकी १ लाभार्थी हप्ता वितरीत झालेला आहे व सदरचा हप्ता वसुल करण्यात येत आहे. अनुसूचित जमातीच्या सदर १० लाभार्थी यांना आदिवासी विकास विभागांतर्गत राबविण्यात येणारी राज्यस्तरीय शबरी आवास योजनेमधून लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि. ठाणे ) येथील कै. बी. जी. छाया उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणेबाबत**

**(२०) ६१९४८ (२८-०४-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि. ठाणे) येथील कै. बी. जी. छाया उपजिल्हा रुग्णालयाचे ५० खाटावरून १०० खाटात श्रेणीवर्धन करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मा. आरोग्य मंत्री, यांनी त्यांच्या दालनात दिनांक १६ नोव्हेबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकी दरम्यान आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधिनी निवेदनाद्वारे मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ३१ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयाची इमारत जुनी असल्याने तसेच रुग्णालयाच्या आवारात मोकळी जागा उपलब्ध असल्याने याठिकाणी सर्व सोयी – सुविधांनी सुसज्ज असे रुग्णालय उभारण्यात यावे अशी देखील मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२८-११-२०२३) :**(१) होय.

(२) होय

(३) होय

(४) उपजिल्हा रुग्णालय, अंबरनाथ चे ५० खाटांवरुन १०० खाटांमध्ये दिनांक २८.०६.२०२३ च्या शासन निर्णयान्वये श्रेणीवर्धन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील पंधरा हजाराच्या वर घरकुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२१) ६२१०५ (२७-०४-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत चंद्रपूर जिल्हयात सन २०१६-१७ ते सन २०२१-२२ या कालावधीत ४३ हजार ४८४ घरकुल बांधकाम करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले असता त्यातील १५ हजार ७८० घरकुलाचे बांधकाम अघापही झाले नसल्याची दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण विकास यंत्रणा चंद्रपूर यांच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेचे काम अधिका-यांच्या दुर्लक्षपणामूळेच प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आलेली आहे, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्या अनुषंगाने १५ हजार घरकुलाचे बांधकाम पुर्ण होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (३०-०१-२०२४) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०१६-१७ ते २०२१-२२ या कालावधीत चंद्रपूर जिल्हयाला ४३ हजार ८४८ घरकुल बांधकाम करण्याचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. त्यापैकी ३८,१८२ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. उर्वरित ५,६६६ घरकुलांपैकी ५,१६४ घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. उर्वरित ५०२ लाभार्थ्यांपैकी जागा उपलब्ध नसलेले ४६६ लाभार्थी आहेत व मयत झालेले ३६ लाभार्थी असून त्यांचे वारस उपलब्ध नाहीत.

अपूर्ण घरकुलांची कामे पूर्ण करण्यासाठी राज्यात महाआवास अभियान राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सर जे.जे. रुग्णालयातील सहयोगी प्राध्यापक यांची नियमबाह्यरित्या झालेल्या बदलीचे आदेश रद्द करणेबाबत

**(२२) ६४७३१ (२५-०८-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा येथील सर जे.जे. रुग्णालयातील मुख्य शल्य चिकीत्सक शास्त्र विभागात कार्यरत असेलेल डॉ.मोहम्मद आयुब सिद्दीकी, सहयोगी प्राध्यापक यांना शासनाने खासगी रुग्णालयात प्रॅक्टीस केल्याप्रकरणी दोषी ठरवून दिनांक २० जून,२०१८ रोजी त्यांची नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अती विशषोपचार रुग्णालयात बदली करण्यात आल्यानंतर ते तीन वर्षे शासकीय सेवेतून गायब असतानाही शासनाने त्यांचे बदलीचे आदेश माहे मार्च, २०२१ मध्ये रद्द करुन त्यांना पुन्हा सर जे.जे. रुग्णालयात पुर्ववत पदावर दाखल करुन घेतल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.सिद्दीकी यांना सर जे.जे. रुग्णालयात एकाच पदावर १५ वर्षाहून अधिक काळ काम करीत असताना शासनातर्फे त्यांना दरमहा २० हजार रुपये प्रमाणे १५ वर्षाचे ३६ लाख रुपये नॉन प्रॅक्टीसींग अलाऊंन्स देण्यात आले असतानाही त्यांनी शासकीय नियमाचे उल्लंघन करुन खाजगी रुग्णालयात प्रॅक्टीस केल्याप्रकरणी त्यांना दोषी ठरवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉ.सिद्दीकी यांच्यावर दिनांक ८ नोव्हेंबर,२०१७ रोजी दोषारोप बजावून त्यांची सुरु असलेल्या विभागीय चौकशीस ६ वर्षे इतका प्रदिर्घ विलंब होऊनही त्यांना कोणत्या नियम व कायद्याच्या आधारे सन २०१८ च्या नागपूर बदलीच्या आदेशापासून तीन वर्षे सेवेतून गायब असतानाही त्यांना पुन्हा कोणच्या मान्यतेने शासन सेवेत घेण्यात आले आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषी डॉक्टरांस त्वरीत सेवेतून बडतर्फ करण्याच्यादृष्टीने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-०१-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशंत: खरे आहे.

(३), (४) व (५) डॉ.मोहम्मद अयुब सिध्दीकी, सहयोगी प्राध्यापक, मुत्रशल्यचिकित्साशास्त्र यांची शासन आदेश दिनांक २०.०६.२०१८ अन्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे करण्यात आलेली बदली सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने शासन आदेश दिनांक १९.०३.२०२१ अन्वये रद्द करण्यात आली आहे. डॉ.मोहम्मद अयुब सिध्दीकी यांच्याविरुध्द खाजगी व्यवसाय करीत असल्याबाबत शासन ज्ञापन दिनांक ०८.११.२०१७ अन्वये दोषारोप बजावून विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच डॉ.सिध्दीकी यांच्याविरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपाची चौकशी करण्याकरिता शासन आदेश दिनांक १७.०४.२०२३ अन्वये चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

---

## राज्यात गर्भवती महिलांचे मृत्यू रोखण्यासाठी करावयायाचया उपाययोजना

**(२३) ६४७८७ (२८-०८-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या सहा वर्षात साडेसात हजार गर्भवती महिलांचा ॲनिमिया, रक्त कमी असणे, रुग्णवाहिकांच्या सुविधा न मिळाल्याने आरोग्य केंद्रामध्ये पोहोचण्यास उशीर होणे, अपुऱ्या दिवसांची प्रसुती, ग्रामीण भागामध्ये घरी प्रसुती होत असणे अशा विविध कारणांमुळे मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात प्रसुतीदरम्यान इतक्या मोठया प्रमाणात महिलांचा मृत्यू होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यात गर्भवती महिलांसाठी उपयुक्त ठरत असलेली माहेरघर योजना तसेच महिलांच्या आरोग्य विषयक जनजागृतीबाबत प्रभावी अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात माहेरघर योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत तसेच महिलांच्या आरोग्य विषयक जनजागृती करणे यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची करणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०१-२०२४) :**(१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात गेल्या सहा वर्षात ७,७५४ इतके मातामृत्यू झालेले आहेत. सदर मृत्यू ॲनिमिया, रक्त कमी असणे या कारणांमुळे झाले आहेत.

(२) राज्यात प्रसुती दरम्यान महिलांच्या मृत्यूची कारणे प्रामुख्याने उच्च रक्तदाब, रक्तस्त्राव, ॲनिमिया ही आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आदिवासी भागात माता व बाल मृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने आदिवासी व दुर्गम भागात माहेरघर योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. माहेरघरामध्ये गरोदर मातेस राहण्याची सोय, आहार, वैद्यकीय तपासणी, बाळंतपणाचा सल्ला व उपचार या सेवा सुविधा देण्यात येतात.

सदर कार्यक्रमाची जनजागृती आशा स्वयंसेविकामार्फत तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येते. त्याचबरोबर जिल्हा स्तरावरुन जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी यांचेमार्फत तसेच माता आरोग्याविषयी रेडीओ, दुरदर्शन, खाजगी टी.व्ही. चॅनेल्स, सोशल मिडीया याद्वारेही जनजागृती करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आशा कर्मचारी, गट प्रवर्तक, शालेय पोषण आहार कर्मचारी, महिला परिचर वअर्धवेळ स्त्री परिचर (PTLA) यांच्या मागण्यासंदर्भात

वि.स. २२९ (15)

**(२४) ६५२६२ (२८-०८-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ७० हजार आशा सेविका व ४ हजार गट प्रवर्तक यांनी कोरोना महामारीमध्ये सर्व्हे करणे तसेच शासनाच्या विविध योजना शेवटच्या नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी काम करतात तथापि त्यांना अल्प मोबदला मिळत असल्याने त्यांनी ४५ व्या व ४६ व्या कामगार परिषदेच्या शिफारशीप्रमाणे किमान वेतन, सामाजिक सुरक्षा, पेन्शन, ग्रॅच्युटी व कायमस्वरूपी शासकीय कर्माचारी दर्जा मिळणे बाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मार्फत शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आशा सेविका कर्मचारी, शालेय पोषण आहार कर्मचारी, अर्धवेळ स्त्री परिचर (PTLA) आणि अंगणवाडी कर्मचारी यांच्या विविध मागण्यांसाठी दि. २६ एप्रिल ते २८ एप्रिल २०२३ या काळात अकोले ते लोणी (जि.अहमदनगर) असा तीन दिवसांच्या पायी मोर्चा अखिल भारतीय किसान सभेने काढला असल्याची बाब माहे. एप्रिल २०२३ च्या शेवटच्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून उक्त कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ एप्रिल २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा.कामगार मंत्री, आणि मा.महिला व बाल विकास मंत्री यांना इमेल द्वारे दिनांक १७ एप्रिल २०२३ रोजी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(३) तसेच, जिल्हा परीषद आरोग्य उपकेंद्रातील महिला परिचरांना मासिक रु. ३०००/- इतके मानधन अदा करण्यात येत असून त्यांना किमान वेतन नुसार मानधन देण्यात येत नाही, आरोग्य विषयक वेगवेगळी कामे करुन सुध्दा त्यांना नियमीत कर्मचा-यां प्रमाणे सोयी सुविधा देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, वर्धा येथील जिल्हा परीषद कार्यालया समोर आशा सेविका व गटप्रवर्तकांनी शासकीय कर्मचा-यांचा दर्जा देणे बाबत यासह इतर विविध मागण्यांसाठी दिनांक ८ मार्च,२०२३ रोजी धरणे आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच,चंद्रपूर जिल्हयातील आरोग्य खात्यातील आशा सेविका व गटप्रवर्तक यांना जानेवारी ते एप्रिल-२०२३ चे वाढीव मानधन व इतर मागण्यांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परीषद व आरोग्य अधिका-यांना निवेदन दिल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, आशा सेविका कर्मचारी, गट प्रवर्तक ,शालेय पोषण आहार कर्मचारी, महिला परीचर,अर्धवेळ स्त्री परिचर (PTLA) यांच्या मागण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०१-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

अंशकालीन स्त्री परिचर यांना किमान वेतन देणे ही बाब धोरणात्मक निर्णय असल्यामुळे अंशकालीन स्त्री परिचर यांचे मानधन रू. ६०००/- करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्यावर कार्यवाही सुरू आहे.

(४) हे खरे आहे.

(५) हे खरे आहे.

(६) सन २०२३-२४ मध्ये आशा स्वयंसेविका यांना ५८ बाबींवर कामावर आधारित मोबदला लागू करण्यात आला आहे. आशांना केंद्र शासनाचे रू. ३०००/- निधी व राज्य शासनाचे रू.५०००/- अदा करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त इतर बाबींवरील कामावर आधारित मोबदला आशांना अदा करण्यात येत आहे. गटप्रवर्तक हे क्षेत्रीय भेटी या तत्वावर नियुक्त करण्यात येतात, केंद्रशासनाचे रू. ८७७५/- व राज्य शासनाचे रू. ६२००/- असे एकत्रित रू.१४९७५/- मासिक मानधन अदा करण्यात आले आहे. ऑगस्ट २०२३ चे मानधन अदा करण्यात येत आहे. आशांना जीवन ज्योती विमा योजना व प्रधानमंत्री जीवन अपघात विमा योजनेमध्ये रू. ४५६/- उपलब्ध करून देण्यात येतात. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनूसार आशा स्वयंसेविका हे कामावर आधारित मोबदला व गटप्रवर्तक हे क्षेत्रीय भेटी करणे या तत्वावर

नियुक्त करण्यात येत असल्याने शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक हे शासकीय कर्मचारी नसल्याने त्यांना नियमित शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे निवृत्ती वेतन व ग्रॅज्युटी इ. लाभ लागू करण्यात येत नाहीत.

---

## लातूर जिल्ह्यातील रुग्णवाहिका चालकांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत

**(२५) ६५७५७ (२८-०८-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील रुग्णांना गावस्तरावरुन प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, व जिल्हा रुग्णालयात पोहोचवण्याचे काम करणाऱ्या रुग्णवाहिका चालविण्यासाठी शासनाने सी.एस.सी.ई. गव्हर्नन्स इंडिया लिमिटेड या एजन्सी कंपनीला माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये नियुक्त केले असून सदर एजन्सी कंपनीमार्फत रुग्णवाहिका चालविण्यासाठी कंत्राटी स्वरुपात काही कर्मचारी नियुक्त केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एजन्सी कंपनीने मागील १६ महिन्यांपासून कर्मचाऱ्यांचे वेतन अदा केले नसल्याचे दिनांक २९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन प्रकरणी लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी कंपनी व्यवस्थापनाशी वारंवार संपर्क साधूनही कंपनी व्यवस्थापनामार्फत उडवाउडवीची उत्तरे देऊन टाळाटाळ करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय , त्यानुसार कर्मचाऱ्यांचे १६ महिन्यांपासूनचे थकीत वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (११-०१-२०२४) :** (१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

सी.एस.एसी. ई-गव्हर्नस सर्विसेस या संस्थेमार्फत लातूर जिल्ह्यातील कार्यरत ५० प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी रुग्णवाहिका वाहनचालक घेण्यात आले असून सदर कंत्राटी वाहनचालकांचे १२ महिन्याचे वेतन प्रलंबित आहे.

(३) हे खरे नाही.

(४) कंत्राटी वाहनचालकांचे वेतन लेखाशिर्ष २२१० ५०४१ (३१) वेतनेत्तर अंतर्गत मानधन अदा करण्यात येते. सन २०२२-२३ मध्ये सदरहू लेखाशिर्षात उपसंचालक, लातूर मंडळ लातूर यांच्याकडून जिल्हा परिषद, लातूर यांना रु.७७.०३ लक्ष इतके अनुदान वितरीत करण्यात आले हाते. तसेच २०२३-२४ मध्ये सदरहू लेखाशिर्षात उपसंचालक, लातूर मंडळ लातूर यांच्याकडून जिल्हा परिषद, लातूर यांना ४० लक्ष इतके अनुदान वितरीत करण्यात आले. त्यामधून माहे मे, २०२२ व जून २०२२ या दोन महिन्यांचे मानधन सी.एस.सी. मार्फत अदा करणेत आले होते. जिल्हा परिषद, लातूर यांचेकडे कंत्राटी वाहनचालक, कंत्राटी स्वच्छता सेवा व कुशल/ अकुशल मनुष्यबळ अशा कंत्राटी सेवा सुरु असल्याने उपलब्ध निधीतून सर्व सेवेची देयके अदा होऊ शकलेली नाहीत. यासाठी आवश्यक रकमेच्या अनुदानासाठी पाठपुरावा करणेत येत आहे.

या व्यतिरिक्त शासन निर्णय, दि.२५.०८.२०२३ अन्वये मा.उच्च न्यायालयात दाखल अवमान याचिकेवरील दिलेल्या आदेशानुसार सुधारित झालेल्या मानधन फरक अदाईसाठी १३ महिन्यांचे वेतनासाठी १ कोटी ५ लक्ष ३० हजार अनुदान उपसंचालकांमार्फत जिल्हा परिषद, लातूर यांना प्राप्त झाले. सदर निधी वाहन चालकांचे खात्यावर वर्ग करण्यात आली आहे.

(५) कार्यवाही सुरु आहे.

---

## अमरनाथ यात्रेसाठी शारीरीक दृष्टया सक्षम असल्याचा दाखला मिळण्यास येणा-या अडचणी

**(२६) ६६२०६ (२५-०८-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरीकांना अमरनाथ यात्रे करीता शासकिय रुग्णालयातील डॉक्टरां कडून शारीरीक दृष्टया सक्षम असल्याचा दाखला घ्यावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा दाखला देण्याचे अधिकार गेल्या वर्षापर्यंत ग्रामीण रुग्णालय, तालुका रुग्णालय तसेच उप-जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना होता मात्र या वर्षी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा शल्य चिकीत्सका यांना हे अधिकार देण्यात आले असल्याचे दिनांक १९ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा नवीन नियम अमरनाथ यात्रेकरुनां अतिशय त्रासदायक होणार असून जिल्हा शल्य चिकीत्सकावर याचा ताण येणार असल्यामुळे पूर्वी प्रमाणेच ग्रामीण व तालुका रुग्णालयातील डॉक्टरांना हे अधिकार देण्यात यावे अशी मागणी यात्रेकरुनी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०४-०१-२०२४) :**(१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा शहरातील खासगी रूग्णालयांनी फायर ऑडिट केले नसल्याबाबत

**(२७) ६६६८८ (२८-०८-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा शहरातील खासगी रूग्णालयांनी गेल्या काही वर्षात फायर ऑडिट केले नाही तसेच काही रूग्णालयांनी ऑडिट केल्यानंतर कोणतेही नुतनीकरण केले नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरमयान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार संबधित रुग्णालय प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबत सद्यःस्थिती काय आहे ?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०१-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) (३) व (४) रुग्णालयांनी नोंदणी अथवा नुतनीकरण करण्यापूर्वी फायर ऑडिट केलेले नसेल तर अग्निशमन विभागाच्या ना- हरकत प्रमाणपत्राशिवाय रुग्णालयाची नोंदणी अथवा नुतनीकरण केले जाणार नाही, अशा सूचना जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांनी संबंधितांना दिलेल्या आहेत.

---

### राज्यात राजस्थान धर्तीवर “आरोग्य हक्क” कायदा करणेबाबत

**(२८) ६६८८७ (२५-०८-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजस्थान शासनाने तयार केलेल्या ‘आरोग्य हक्क कायद्या’च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात देखील ‘आरोग्य हक्क कायदा’ लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कायद्यानुसार विशिष्ट प्रकारच्या वैद्यकीय तातडीच्या परिस्थितीमध्ये खासगी डॉक्टरांनी प्राथमिक तातडीची वैद्यकीय सेवा देणे व योग्य ठिकाणी रुग्णाला पाठवणे हे त्यांना बंधनकारक केले असून त्यासाठी रुग्ण शुल्क भरु शकत नसेल तर सरकारने त्याचा परतावा देणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कायदयाची शासनाने माहिती घेऊन सदरील कायदा राज्यात लागू करण्याबात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०१-२०२४) :**(१), (२) व (३) राजस्थान राज्याच्या धर्तीवर राज्यात "आरोग्य हक्क कायदा" लागू करण्याच्या अनुषंगाने मसुदा तयार करण्यात आला असून तो विधी व न्याय विभागाकडे तपासण्यासाठी पाठविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रुग्णलयामध्ये तक्रारनिवारण कक्ष स्थापन करणेबाबत**

**(२९) ६६८८९ (२८-०८-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायदा नियम २०२१ मध्ये केलेल्या तरतुदी नुसार रुग्णांच्या तक्रारींचे निरसन करण्यासाठी प्रत्येक रुग्णालयाने तक्रार निवारण कक्ष स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले होते तथापि दोन वर्ष उलटूनही याची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ पुणे, नाशिक आणि सांगली या तीन जिल्ह्यांनी योग्य फोन नंबर सह तक्रार कक्ष स्थापन केले असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरीत जिल्ह्यांमधील रुग्णालयांमध्ये तक्रार निवारण कक्ष स्थापन न करण्याची कारणे काय आहेत तसेच सर्व जिल्ह्यांमधील रुग्णालयांमध्ये तक्रार निवारण कक्ष कधीपर्यंत स्थापन करण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, त्याची काय कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०१-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी (सुधारित) नियम, २०२१ नुसार जिल्हास्तरावरील पर्यवेक्षकीय प्राधिकरणामार्फत तक्रार निवारण कक्षाची निर्मिती करण्यात आलेली आहे. प्राप्त झालेल्या तक्रारींची या प्राधिकरणामार्फत चौकशी करुन योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातल्या किशोरवयीन मुलींमध्ये रक्त क्षयाचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(३०) ६७४१९ (२८-०८-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) राज्यातील विविध जिल्ह्यांतील किशोर वयीन मुलींमध्ये रक्त क्षयाचे प्रमाण वाढत असल्याची बाब हार्वर्ड विद्यापीठातील जिओग्राफिक इनसाईट्स लॅबच्या संशोधनातून निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

२) असल्यास ,रक्त क्षया मुळे महिलांमध्ये अनेक आजार वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,

३) असल्यास, महिलांमधील रक्त क्षयाचे प्रमाण प्रमाणशीर व्हावे यासाठी शासनाने कोणत्या उपाय योजना केल्या वा करण्यात येत आहे?

**डॉ. तानाजी सावंत (१६-०१-२०२४) :**(१) होय.

(२) होय.

(३) रक्तक्षयामुळे शारिरीक वाढ योग्यरितीने न होणे, शारिरीक कार्यक्षमता कमी असणे, शारिरीक व बौद्धिक वाढ कमी असणे, संसर्गजन्य रोगास बळी पडणे, यासारखे दुष्परिणाम होतात.

महिलांमधील रक्तक्षयाचे प्रमाण रोखण्यासाठी खालील प्रमाणे उपाय योजना करण्यात येत आहेत.

• केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार राज्यामध्ये ॲनिमिया मुक्त भारत अभियानांतर्गत प्रजननक्षम स्त्रियांवर उपचार करण्यात येतात. त्याकरीता प्रतिबंधात्मक लोहयुक्त गोळयांचा पुरवठा, जंतनाशक औषधी तसेच हिमोग्लोबीन तपासणी करण्यात येते. या सेवा राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, जिल्हा रुग्णालये व सामान्य रुग्णालये यांच्या मार्फत मोफत दिल्या जातात.

• ॲनिमिया मुक्त भारत अभियानांतर्गत प्रत्येक प्रजननक्षम लाभार्थींना दर आठवडयाला १ यानुसार १५-४९ वर्षे या दरम्यान लोहयुक्त गोळी (६० मिली ग्रॅम लोह व ५०० मायक्रो ग्रॅम फॉलिक ॲसीड- लाल गोळी) देण्यात येते.

• प्रत्येक गरोदर मातेस लोहयुक्त गोळयांचा पूरक डोस प्रसूतीपूर्व ६ महिने व प्रसूती पश्चात ६ महिने देण्यात येतो. जर HB ≥ ११ gm% असेल तर रोज १ गोळी, अशा १८० गोळया आणि जर HB ≤ ११ gm% असेल तर रोज २ गोळ्या, अशा एकूण ३६० गोळ्या देण्यात येतात. जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत गरजेनुसार तीव्र रक्तक्षय असलेल्या मातांना मोफत शिरेद्वारे इंजे. आयर्न सुक्रोजही देण्यात येते. गरजेनुसार मोफत रक्त पुरवठा करण्यात येतो. गरोदर मातेस पहिल्या तिमाहीनंतर जंतनाशकाची १ गोळी देण्यात येते.

• गरोदर मातांची आरोग्य कर्मचाऱ्यामार्फत गावपातळीवर ग्राम आरोग्य व पोषण दिनाच्या दिवशी आहाराबाबत मार्गदर्शन आणि समुपदेशन करण्यात येते. तसेच संस्था स्तरावर १२ आठवडयाच्या आत व लवकरात लवकर नोंदणीसह किमान ४ वेळा आरोग्य कर्मचाऱ्यामार्फत तपासणी करण्यात येते.

• ग्राम आरोग्य पोषण दिवस अंतर्गत रक्तक्षयाचे प्रमाण रोखण्यासाठी महिलांना आशा कार्यकर्ती तसेच इतर आरोग्य कर्मचारी यांच्याद्वारे आरोग्य शिक्षण, आहाराबाबत मार्गदर्शन आणि समुपदेशन केले जाते.

---

**अमरावती जिल्हयात प्राथहमक आरोग्य केंद्रातील प्रयोगशाळेत तपासणी होत नसल्याबाबत**

**(३१) ६७४२५ (२८-०८-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खासगी प्रयोग शाळेत रक्त व इतर तपासणीसाठी जादा शुल्क आकारले जात असल्याने रुग्णांसाठी जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात रक्त व इतर तपासणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असे असतानाही अमरावती जिल्हयातील ३७ प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रयोगशाळेत शून्य तपासणी झाली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार अमरावती जिल्हयातील आरोग्य केंद्रातील प्रयोगशाळेत रक्त व इतर तपासणी न होण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच, यास जबाबदार असण्या-या संबधित आरोग्य अधिकारी, कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

वि.स. २२९ (20)

**डॉ. तानाजी सावंत (३१-०१-२०२४) :**(१) होय.

राज्यातील आरोग्य संस्थांमध्ये प्रयोगशाळा सेवा प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरापर्यंत उपलब्ध करुन देण्यासाठी बाह्ययंत्रणेमार्फत अमरावती जिल्हयातील एकूण ५९ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मोफत रक्त व इतर तपासणी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही

अमरावती जिल्हयातील एकूण ५९ प्राथमिक आरोग्य केंद्रामधील प्रयोगशाळेत माहे एप्रिल २३ या महिन्यात मलेरिया, टी.बी. व बाह्ययंत्रणेद्वारे नियुक्त संस्थेमार्फत एकूण १०४०९ एवढया तपासण्या करण्यात आल्या आहेत. तसेच जानेवारी २०२३ ते जुन २०२३ या दरम्यान एकुण ६३२५६ एवढया (मलेरिया, टीबी व रक्ततपासण्या) तपासण्या करण्यात आल्या आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यावल (जि.जळगाव ) येथील उपजिल्हा रुग्णालया करीता जमिनीचे हस्तांतरण होणेबाबत

**(३२) ६७५७४ (२८-०८-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल (जि.जळगाव ) येथील ग्रामिण रुग्णालयाला दहा वर्षापूर्वी उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळालेला आहे मात्र जागेअभावी तेथील काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हतनुर पाटबंधारे विभागाची चोपडा रस्त्यावरील २५ हेक्टर विनावापर जागा रुग्णालयासाठी मिळावी अशी मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**डॉ. तानाजी सावंत (०४-०१-२०२४) :**(१) होय.

(२) होय.

(३) व (४) मंडळ अधिकारी, यावल व तहसिलदार यावल यांचे कार्यालयाकडून जागा उपलब्ध करुन देणेसाठीची कार्यवाही सुरु आहे.

---

## नाशिक जिल्हयातील क्रीडा क्षेत्राच्या विकासाला चालना देण्याबाबत

**(३३) ६७६५८ (२३-०८-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील क्रीडा क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासाठी शिवाजी स्टेडियमच्या जागेवर उभारण्यात येणाऱ्या जिल्हा क्रीडा संकुलाच्या कामाची प्रगतीची सद्य:स्थिती काय आहे,

(२) असल्यास, सदर क्रिडा संकुलाच्या आराखडा तयार करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उक्त आराखडयास किती खर्च अपेक्षित आहे व त्यासाठी आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,

(४) सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने सदर क्रीडा संकुलाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (३१-०१-२०२४) :**(१), (२) व (३)

नाशिक येथे छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमच्या जागेवर उभारण्यात येणाऱ्या जिल्हा क्रीडा संकुलाच्या कामास मान्यता देण्यात आलेली आहे. जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या निर्णयानूसार सा.बां. विभाग, नाशिक याच्या माध्यमातुन क्रीडा संकुलाचा आराखडा तयार करुन या कामाच्या निविदा माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. जिल्हा क्रीडा संकुल, नाशिक करीता रु.२८१७.५५ लक्ष एवढया रक्कमेच्या अंदाजपत्रकास सन २०२२ मध्ये मान्यता देण्यात आली असून रु.५३१.०८ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

वि.स. २२९ (21)
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गुहागर व खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील महाराष्ट्र मेरिटाईम मंडळामार्फत मंजूर झालेल्या कामांबाबत

**(३४) ६८२०७ (२७-०९-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील मौजे अंजनवेल भोईवाडी, पांगारी तर्फे हवेली आडी गीजेवाड येथे जेट्टीलगत जोडरस्ता तयार करणे, पडवे भाटले ते पडवे बंदरटो, नवानगर काताळे मुख्य रस्ता, कुडली बंदर येथे जेट्टीपर्यत असलेल्या रस्ताची दुरुस्ती करणे, पालशेत बाजारपेठ खारवी व बहिरवली येथे जेट्टीचे नूतनीकरण व संरक्षक भिंत बांधण्याबाबत तसेच खेड तालुक्यातील मौजे होडखाड भोईवाडी येथे रस्ता तयार करणे करण्याबाबत महाराष्ट्र मेरिटाईम मंडळाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामांची निविदा प्रक्रिया होवून कामे पूर्णत्वास गेली आहेत काय, कामाची सद्यस्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त कामे प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय बनसोडे (०९-०१-२०२४) :**(१) होय.
(२), (३) व (४) कुडली बंदर येथे जेट्टीपर्यंत रस्त्याचे काम ग्रामपंचायतीमार्फत पुर्ण करण्यात आलेले आहे.
तसेच पडवे बंदर, नवानगर काताळे, बहिरवली येथील कामांची निविदा प्रक्रियेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
त्याचप्रमाणे उर्वरीत अंजनवेल भोईवाडी, पांगारी तर्फे हवेली, पालशेत बाजारपेठ खारवी व होडखाड भोईवाडी या ठिकाणांचे सर्व्हेक्षण करुन कामांची अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे, प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर आवश्यकते नुसार पर्यावरण विषयक दाखले प्राप्त करुन घेऊन सदर कामांची निविदा प्रक्रीयेची कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

## बसमत (जि.हिंगोली ) येथील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर व कर्मचारी हजर राहत नसल्याने रुग्णांची होत असलेल्या गैरसोय

**(३५) ६८२१७ (२८-०८-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बसमत (जि.हिंगोली) येथील स्त्री रुग्णालयात एक महिला प्रसुतीसाठी आलेली असताना तीची कोणीही दखल घेतली नसल्याने तीची प्रसुती रिक्षामध्येच झाली असल्याची बाब माहे,जून, २०२३ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यावेळी तेथील डॉक्टर आणि कर्मचारी निरोप सभारंभात मग्न असल्याचे निदर्शनास आले असून येथील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर व कर्मचारी हजर राहत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निरोप संमारंभ कार्यालयीन वेळेत घेवू नये अशा शासनाच्या सुचना असतानाही सदरचा निरोप समारंभाचा कार्यक्रम सुरू होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी त्रिसदस्यीय चौकशी स्थापन करुन चौकशी करण्यात आली आहे,हे ही खरे आहे काय ,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने याप्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. २२९ (22)

**डॉ. तानाजी सावंत (०१-०१-२०२४) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

(५) सदर प्रकरणी चौकशी अहवालानुसार श्रीमती अलका विजय मोरे, रा. मोरगांव, ता. सेलू यांना दि. ०५/०६/२०२३ प्रसूतीकरीता ऑटोरिक्षाने बसमत येथे घेऊन जात असतांना रुग्णालयात पोहचण्यापूर्वीच ऑटो रिक्षात प्रसूती झाल्याने सदर महिलेस व बाळास स्त्री रुणालय, बसमत येथे दाखल करुन घेण्यात आले. सदर रुग्णालयात बालरोग व स्त्रीरोग तज्ज्ञांमार्फत त्यांची तपासणी करुन औषधोपचार करण्यात आले आहेत. तथापि, बाळाचे वजन कमी असल्याने व श्वासाची गती जास्त असल्याने नांदेड येथे संदर्भित करण्यात आले. चौकशी अहवालानुसार याप्रकरणी कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा झाला असल्याचे दिसून येत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयात रुग्णांना जेवण त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या भांडयामध्ये देत असल्याबाबत**

**(३६) ६८६४७ (२५-०८-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयात दररोज रुग्णांना देण्यात येत असलेले जेवण रुग्णांकडे उपलब्ध असलेल्या भांडयामध्ये देत असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३)असल्यास, त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४)नसलयास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (११-०१-२०२४) :**(१) नाही.

(२) अशा आशयाची तक्रार जिल्हा रुग्णालय, नाशिक प्रशासनाकडे कोणीही केलेली नाही किंवा असा प्रकार कोणी निदर्शनास आणून दिलेला नाही. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न निर्माण झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शासकीय रुग्णांलयामध्ये अवयवदानाची नोंद होत नसल्याबाबत**

**(३७) ६८७९५ (२५-०८-२०२३). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रामुख्याने मुंबईत अवयव प्रत्यारोपणाची सुविधा असुनही मागील पाच वर्षात शासकीय रुग्णालयामध्ये केवळ सहा मृत व्यक्तींच्या अवयवदानाची नोंद करण्यात आली असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, शासकीय रुग्णालयामध्ये दाखल होणा-या रुग्णांची संख्या अधिक असते मात्र सक्रिय अतिदक्षता पथके आणि प्रत्यारोपण समन्वयकांची उपलब्धता नसल्याने ही रुगणालये अवयवदानामध्ये मागे पडत आहेत,हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१७-०१-२०२४) :**(१) मागील पाच वर्षात राज्यात शासकीय रुग्णालयामध्ये २९ मृत व्यक्तींच्या अवयवदानाची नोंद असून महाराष्ट्रात शासकीय व खाजगी रुग्णालयांमध्ये मागील पाच वर्षात २६८ मृत व्यक्तींच्या अवयवदानाची नोंद करण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

वि.स. २२९ (23)

संभाव्य ब्रेनडेड रुग्ण ओळखण्यासाठी सरकारी रुग्णालयामध्ये समर्पित ICU कर्मचारी तसेच प्रशिक्षित इंटेसिव्हीस्ट नाहीत. जेव्हा मुंबईतील शासकीय रुग्णालयात; संचालक, रोटो-सोटो, मुंबई यांचेकडे समुपदेशनासाठी समन्वकाची मागणी केली जाते. तेव्हा रोटो-सोटोचे समन्वयक शासकीय रुग्णालयात अवयव आणि ऊतक दानासाठी समुपदेशनासाठी जात असतात.

(३) रिजनल ऑर्गन ॲन्ड टिश्यु ट्रांसप्लान्ट ऑर्गनायझेशन, मुंबई यांचे मार्फत सार्वजनिक रुग्णालयात अवयवदान वाढवण्यासाठी खालीलप्रमाणे प्रयत्न केले गेले आहेत.

१. नॅशनल ऑर्गन ट्रांसप्लान्ट प्रोग्राम या कार्यक्रमा अंतर्गत ६ महिन्यांसाठी के.ई.एम. रुग्णालय, नायर रुग्णालय आणि जे. जे. रुग्णालयामध्ये अवयवदानाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्यारोपण समन्वयकांची नियुक्ती  करुन रुग्णालयामध्ये जनजागृती सत्रे घेण्यात आली.

२. अवयवदान सुलभ करण्यासाठी अधिष्ठाता, के.ई.एम. रुग्णालय, मुंबई यांच्या देखरेखीखाली विभाग प्रमुखांच्या बैठकांचे आयोजन करण्यात आले.

३. जेव्हा जेव्हा शासकीय रुग्णालयांकडून रोटो- सोटो, मुंबई यांचेकडे विनंती केली जाते, तेव्हा रोटो- सोटोचे समन्वक शासकीय रुग्णालयात अवयव आणि ऊतक दानाची समुपदेशनासाठी जातात.

४. UG/PG विद्यार्थी, डॉक्टर, परिचारिका, MSW & ICU कर्मचारी यांच्यासाठी आयोजित प्रशिक्षण आणि जागरुकता, अवयवदानाला प्रोत्साहन देण्यासाठी रॅली आयोजित केली, के.ई.एम. रुग्णालय परिसरात स्टॉल लावले.

५. ऍनेस्थेसिया, सर्जरी आणि मेडिसिन विभागाच्या डॉक्टरांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

६. के.ई.एम. मधील विविध विभागांसोबत अवयव दानावर नियमित सत्रे आयोजित करण्यात आली.

७. हँडस ऑन कॅडेव्हर ऑर्गन रिट्रीव्हल वर्कशॉप सरकारी हॉस्पीटलमध्ये शल्य चिकित्सकांसाठी आयोजित करण्यात आले आहे. ऑर्थो  विभागाला हाडे काढण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंडपिपरी (जि. चंद्रपूर) येथील ग्रामीण रुग्णालय इमारतीचे बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३८) ६८८५३ (२५-०८-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडपिपरी (जि. चंद्रपूर) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या  इमारतीचे नव्याने बांधकाम करण्यासाठी अंदाजपत्रक मागवून निधी उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी  जिल्हाधिकारी यांना दिनांक ०८ जून,२०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रुग्णालयासाठी नव्याने इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**डॉ. तानाजी सावंत (०४-०१-२०२४) :**(१)  होय.

(२) गोंडपिपरी जि. चंद्रपूर येथील ग्रामीण रुग्णालय नविन  इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त होताच  शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

(३)  प्रश्न उद्भवत नाही.

---

**पौड (ता. मुळशी,जि.पूणे ) येथील ग्रामीण रुग्णालयातील गैरकारभाराबाबत**

**(३९) ६९४०४ (२८-०८-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. २२९ (24)

(१) पौड (ता. मुळशी,जि.पुणे ) येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक, सहायक अधीक्षक, डॉक्टर आणि नर्स यांच्या गैरहजेरीत रुग्णालयाचा कारभार सुरू असल्याचे माहे जून, २०२३ च्या पहिल्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयातील अधिकारी / कर्मचारी हे पोस्ट मार्टेम करण्यात आलेले शव देण्यासाठी मयताच्या नातलगाकडून पैश्याची मागणी करणे ,वैद्यकीय अधिकाऱ्यांचे शिक्के वापरून खोटे वैद्यकीय प्रमाणपत्रे देऊन आर्थिक लूट करणे, रुग्णांना वेळेत उपचार न देणे, रात्रीच्या वेळी महिला कर्मचाऱ्यांना त्रास देणे असे प्रकार निदर्शनास येत आले आहेत,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास ,सदर रुग्णालयाच्या भागात खाजगी प्रशिक्षण देणाऱ्या इन्स्टिट्यूट मधील मुलींना वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांच्या संमतीविना रुग्णसेवा देण्यात येत असून प्रशिक्षणाच्या नावाखाली रुग्णांना इंजेक्शन देणे, रक्त तपासणी करणे, केस पेपर काढणे इत्यादी रुग्णसेवेचे कार्य करीत असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,येथे बायोमेट्रिक प्रणालीद्वारे रुग्णालयातील डॉक्टर, नर्स, कर्मचाऱ्यांचे वेतन काढण्यात यावे असा आदेश आयुक्त व उपसंचालक,सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी माहे,नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान काढला होता तथापि दररोज बायोमेट्रिक हजेरी द्यावी लागू नये म्हणून बायोमेट्रिक मशीनमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पाणी ओतून मशीन नादुरुस्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर घटनेचा तपास करण्याकरिता पौड ग्रामीण रुग्णालयातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यात आले आहेत काय,

(६) असल्यास, या रुग्णालयात गैरकारभार करण्या-या संबधितावर कारवाई करणेसह बायोमेट्रिक यंत्राद्वारे हजेरी बंधन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१७-०१-२०२४) :**(१) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय पौड येथे सर्व अधिकारी कर्मचारी शासनाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये कर्तव्यावर उपस्थित असतात. तसेच अधिकारी व कर्मचारी हे २४ तास रुग्णसेवा देत आहेत.

(२) हे खरे नाही.

या ग्रामीण रुग्णालय, पौडच्या रुग्णालयीन प्रशासनामध्ये अशी तक्रार कोणत्याही नागरिकाकडून अद्याप पर्यंत प्राप्त नाही. सदरची खोटी तक्रार ही अज्ञात इसमाने ग्रामपंचायत पौडच्या लेटर हेडचा वापर करुन केली असल्याचे सरपंच ग्रामपंचायत पौड यांनी त्यांच्या दिनांक १२/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये जि.श.चि. पुणे यांना कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

नपाते स्कुल ऑफ नर्सिंग इन्सिट्युटच्या मुली रुग्णालयीन अभ्यासक्रमा करिता रुग्णालयास भेटी देत असतात त्यांच्याकडून कोणतेही रुग्णालयीन कामकाज करुन घेतले जात नाही.

(४) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय पौड येथे झेनॉन या संस्थेमार्फत बायोमेट्रीक मशीन खरेदी करुन बसविण्यात आलेली आहे. सदर मशीन मध्ये संस्थेमार्फत तपासणी करुन तांत्रिक कारणामुळे नादुरुस्त झाली असल्याचे कळविले आहे व सध्या ती मशीन कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

(५) हे खरे नाही.

सदर मशीन मध्ये पाणी टाकुन नादुरुस्त करण्यात आली नसल्याचा अहवाल झेनॉन कंपनी मार्फत देण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दत्तवाड, (ता. शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील ग्रामीण रूग्णालयाच्या इमारत पुर्नबांधणीकरीता निधी उपलब्ध करण्याबाबत

**(४०) ६९४१५ (२८-०८-२०२३). श्री.राजेंद्र शामगोंडा पाटील (यड्रावकर) (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.दत्तवाड (ता. शिरोळ, जि.कोल्हापूर) येथील ग्रामीण रूग्णालयाची इमारत ४० ते ५० वर्षे जुनी असून सद्यस्थित

इमारतीची दूरवस्था झाली असल्याने पुर्नबांधणी करता तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा अशी लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. सार्वजनिक आरोग्यमंत्री यांचेकडे दिनांक १८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, त्याबाबतचा निर्लेखन अहवाल कोल्हापूर विभागाने संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांचेकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय;
(३) असल्यास, उपसंचालक आरोग्य मंडळ, कोल्हापूर यांनी सह-संचालक आरोग्य सेवा रूग्णालचे (राज्यस्तर) यांना लेखी पत्र पाठवून ३० खाटांच्या नवीन रूग्णलय इमारत बांधकाम करणेच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी व निधी उपलब्ध करून देण्याबाबत दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्र लिहून विनंती केली होती, हे ही खरे आहे काय;
(४) असल्यास, वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रूग्णालय दत्तवाड, जिल्हा शल्य चिकित्सक, कोल्हापूर, स्थानिक लोकप्रतिनिधी, अन्य अनेक राजकीय व सामाजिक संघटनानी शासनाकडे वारंवार मागणी करूनही निधी उपलब्ध न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५)असल्यास, या रूग्णालयाच्या बांधकामाकरीता किती निधी व किती दिवसात उपलब्ध करून देण्यात येणार आहे ,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०५-०२-२०२४) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) ग्रामीण रुग्णालय, दत्तवाड येथे नवीन इमारत बांधकामाचे रु.२०७४.०० लक्ष इतक्या रकमेचे अंदाजपत्रक व आराखडयाचा प्रस्ताव आयुक्तालयाकडून प्राप्त झाला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केल्यानुसार सदर इमारत बांधकामाच्या रु.१६४.७८ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय, दि.२३.०८.२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलडाणा जिल्ह्यात जिल्हा परिषदेतर्गत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन (NRHM )अंतर्गत काम करण्या-या आरोग्य कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(४१) ६९४९२ (२८-०८-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्ह्यात जिल्हा परिषदेतर्गत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन (NRHM) अंतर्गत आरोग्यदायी सेवा करणारे ८०० कर्मचारी विविध पदावर जिल्ह्यात सर्वत्र कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांना निधी असूनही या कर्मचाऱ्यांचे वेतन तीन महिन्यांपासून अदा करण्यात आले नसल्याचे दिनांक १५ जून,२०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे ,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास ,शासनाच्या परिपत्रका नुसार एक तारखेला वेतन अदा करण्यात यावे, असे स्पष्ट आदेश असताना वेतन न होण्याची कारणे काय आहेत?
**डॉ. तानाजी सावंत (१२-०१-२०२४) :**(१) हे खरे आहे.
बुलढाणा जिल्हयात जिल्हा परिषदेतील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत एकूण ७६८ व समुदाय आरोग्य अधिकारी १६७ असे एकूण ९३५ कंत्राटी अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.
(२) हे खरे आहे.
राज्य स्तरावरून राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत बुलढाणा जिल्हयात सन २०२३-२४ या अर्थिक वर्षा करिता खालील प्रमाणे अनुदानाचे वितरण करण्यात आले होते.
१) पहिला हप्ता - रू.३५१.३४ लक्ष दि. ११.०४.२०२३
२) दुसरा हप्ता - रू.७१५ लक्ष दि. २५.०४.२०२३
३) तिसरा हप्ता - रू.६० लक्ष दि. १७.०५.२०२३

४) चौथा हप्ता - रू. ३५१.३४ लक्ष दि . २२.०६.२०२३
५) पाचवा हप्ता - रू.१९८६.३४ लक्ष दि. १२.०७.२०२३
जिल्हयातील कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांचे माहे एप्रिल २०२३ चे १५ जून २०२३ रोजीचे मानधन अदा करण्यात आलेले आहे. तसेच मे, २०२३ चे मानधन ३० जून २०२३ रोजी अदा करण्यात आलेले आहे. व जून २०२३ चे मानधन १७ जूलै २०२३ रोजी अदा करण्यात आलेले आहे.
(३) राज्यस्तरावरून जिल्हा स्तरावर वितरित केलेल्या अनुदानामधून दरमहा कंत्राटी अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यात येते. तथापि तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे असमाधानकारक कामकाजामुळे वेतन अदा करण्यास विलंब झाला असून त्यांचे विरूध्द प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

---

## स्वाइन फ्लूच्या रुग्णांना खर्च प्रतिपूर्ती करण्याबाबत

**(४२) ७०१५९ (२८-०८-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गरीब, आर्थिक दृष्टा दुर्बल अश्या स्वाइन फ्लू आजाराचे रुग्ण खाजगी रुग्णालयात व्हेंटिलेटर किंवा लाइफ सपोर्ट प्रणालीवर उपचार घेत असतील तर त्या सर्व रुग्णांचा खर्च शासनाकडून करण्याचा निर्णय दिनांक २ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आजाराची साथ संपेपर्यंत खर्च प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय लागू करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुग्णांना खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत जिल्हाधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांची समिति स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आजतागायत स्वाइन फ्लूच्या किती रुग्णांना या माध्यमातून खर्च प्रतिपूर्ती करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (३०-१०-२०२३) :**(१) होय.
(२) दिनांक २० मार्च, २०१५ च्या शासन निर्णयाद्वारे सदर निर्णय साथ संपेपर्यंत प्रतीपुर्ती करण्यास मान्यता दिली होती.
तथापि, शासनाच्या दिनांक ३१.१०.२०२२ च्या शासन निर्णयान्वये स्वाईन फ्ल्यू या आजाराने बाधित खाजगी रुग्णालयात गंभीर स्थितीत जिवनावश्यक प्रणालीवर उपचार घेतलेल्या रुग्णांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती दिनांक ०१.०४.२०२२ पासून पुर्वलक्षी प्रभावाने बंद करण्यात आली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सन २०१५ पासून आजतागायत स्वाईन फ्ल्यू च्या १७२ रुग्णांना या माध्यमातून खर्च प्रतिपूर्ती करण्यात आली असून, उर्वरित ९ जिल्हयातील ६५ रुग्णाना प्रतिपूर्ती करणे बाकी आहे. त्यासाठी रु. १.२५ कोटी ची पुरवणी मागणी मंजूर करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगणा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील अडेगांव प्राथमिक आरोग्य केंन्द्राची नविन इमारत बांधकामाबाबत

**(४३) ७०२१६ (२८-०८-२०२३). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील दुर्गम भागातील अडेगांव प्राथमिक आरोग्य केंन्द्राची इमारतीची दूरवस्था झाली असल्याने सदर इमारत पाडून त्याठिकाणी नविन इमारत बांधकामाकरिता लोकप्रतिनिधी यांनी मा. मंत्री यांना लेखी पत्र दिले होते , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंन्द्राच्या नविन इमारत बांधकामांसाठी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२३-२४ अंतर्गत तातडीने मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

वि.स. २२९ (27)

**डॉ. तानाजी सावंत (०६-१०-२०२३) :**(१) होय

(२) अनुशेषांतर्गतची प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र बांधकामासाठी संबंधित जिल्हा नियोजन विकास मंडळामार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो. सदर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हा नियोजन विकास मंडळ, वर्धा मार्फत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुरुड (ता.जि. लातूर) ट्रामा केअर संटर व उप जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामासाठी निधीची तरतूद करण्याबाबत**

**(४४) ७०४७८ (२८-०८-२०२३). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड (ता.जि. लातूर) येथे मंजूर करण्यात आलेल्या ट्रामा केअर सेंटरमधील अस्थापनावरील पदे भरण्यात आली असून निधीअभावी इमारतीचे बांधकाम प्रलंबित असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ट्रामा केअर सेंटर रुग्णांसाठी लवकर सुरु व्हावे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा केला असून हरित बांधकाम (Green building) संकल्पनेतून बांधण्यात येत असलेल्या सदर इमारत बांधकामासाठी दिनांक १२ जूलै २०२१ रोजी वा त्यासुमारास रुपये ११६९.८७ लक्ष निधीची पत्राद्वारे मागणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३)तसेच,निजामकालीन बांधकाम असलेल्या व ५० खाटांत श्रेणीवर्धित झालेल्या मुरुड (जि. लातूर) येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आलेल्या संरचनात्मक लेखापरीक्षण (Structural Audit) अहवालात इमारत वापरण्यास अयोग्य असल्याचा अहवाल दिला असून सदर रुग्णालयाच्या नवीन इमारत बांधकामासाठी पुरेशी जागा उपलब्ध असून यासंबंधीचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुरुड येथील ट्रामा केअर सेटर व उप जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०५-०२-२०२४) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

सदर ट्रामा केअर सेंटर सद्यस्थितीत ग्रामीण रुग्णालय, मुरुड च्या इमारतीमध्ये रुग्णांसाठी कार्यान्वित असून ट्रॉमा केअर सेंटर च्या उपलब्ध सेवा रुग्णांना देण्यात येतात.

(३) हे खरे आहे.

(४) मुरुड, जि.लातूर येथील ट्रॉमा केअर सेंटर बांधकामाचे प्रचलित दरसूचीवर आधारित अंदाजपत्रक प्राप्त झाल्यावर तपासून त्वरीत योग्यती कार्यवाही करण्यात येईल.

मुरुड येथील श्रेणीवर्धीत ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय इमारत बांधकामाचे रु.२५४७.३७ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रकास दि.०१.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नर्सी (नामदेव) (जि.हिंगोली,) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सर्व मूलभूत सेवा सुविधा पुरविण्याबाबत**

**(४५) ७०६५३ (२८-०८-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नर्सी (नामदेव) (जि.हिंगोली,) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये गत काही महिन्यापासून औषधांचा तुटवडा ,अपुरे मनुष्यबळ, प्रसुतीसाठी लागणारे साहित्याची कमतरता व अन्य साधनांचा अभाव असल्याचे माहे जून ,२०२३ च्या तिसऱ्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात असल्याने रुग्णांची गैरसोय होत असून या रुग्णांना औषधे स्वखर्चाने घ्यावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नर्सी (नामदेव) येथील दवाखान्यातील सर्व मूलभूत सेवा सुविधा रुग्णांना तात्काळ देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२७-१०-२०२३) :**(१) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र नर्सी, (नामदेव) ता.जि. हिंगोली येथे जिल्हास्तरावरून मागणीप्रमाणे औषधसाठा व साहित्यसामुग्रीचा पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच प्रसुतीसाठी लागणारे आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. त्यामुळे नर्सी (नामदेव) प्राथमिक आरोग्य केंद्रात कोणत्याही औषधी व सामुग्रीचा तुटवडा नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्रात, वैद्यकीय अधिकारी यांची ०२ पदे मंजूर असून, ती भरलेली आहेत. तसेच वर्ग-३ व ४ संवर्गाची एकूण मंजूर १३ पदांपैकी ०६ पदे भरलेली असुन ७ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांपैकी आरोग्य सेविका व प्रयोगशाळा तंत्रज्ञ कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेले आहेत. औषध निर्माण अधिकारी या रिक्त पदावर नागरी दवाखाना, दिग्रस येथील कर्मचारी यांना अतिरिक्त पदभार देण्यात आलेला आहे. तसेच सफाईगार व परिचर सेवा आवश्यकतेनुसार रोजंदारी तत्वावर उपलब्ध करून घेतल्या जातात. संदर्भिय सेवा देण्यासाठी रुग्णवाहिका उपलब्ध आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सदर प्राथमिक आरोग्य नर्सी (नामदेव) येथे आवश्यक तो औषधी साठा व साहित्य सामुग्री उपलब्ध असुन रुग्णांना औषधे स्वखर्चाने घ्यावी लागत नाहीत. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक सोयीसुविधा पुरविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कर्जत (जि.रायगड ) तालुक्यतील बीड ग्रामपंचायतीमधील एका आदिवासी महिलेस आरोग्य उपकेंद्रात वेळेवर उपचार न मिळाल्याने आरोग्य केंद्राच्या बाहेर प्रसुती झाल्याबाबत

**(४६) ७०६८४ (२८-०८-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील बीड ग्रामपंचायतीमधील एका आदिवासी महिलेची आरोग्य उपकेंद्रात वेळेवर उपचार न मिळाल्याने आरोग्य केंद्राच्या बाहेर तेथील ग्रामस्थांच्या मदतीने तिची प्रसूती करण्यात आली असल्याचे दिनांक २६ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यावेळी तेथे डॉ.करवंदे, सेविका सोनावणे उपस्थित होत्या तसेच रुग्णवाहीकेचे चालक श्री.नितीन देशमुख दारुच्या नशेत असल्याने सदर महिला दिड तास प्रसूतीवेदना सहन करत आरोग्य केंद्राबाहेर होती, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदर आरोग्य केंद्राची इमारत धोकादायक झाली असून तेथील पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करणेसह भविष्यात अशा घटना घडू नये याकरिताकोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०१-२०२४) :**(१) व (२) हे अशंत : खरे आहे.

श्रीमती रेणूका सचिन वाघमारे, यांच्या प्रसूतीची अपेक्षित तारीख दि. ०९/०७/२०२३ होती. तथापि, त्यांना दि. १८.०६.२०२३ रोजी रात्री ९.१५ वाजता प्रसुती वेदना सुरु झाल्याने त्यांनी त्याबाबत प्राथमिक आरोग्य केंद्र, मोहिली येथील अंगणवाडी सेविका श्रीमती कामिनी सोनावणे यांच्याकडे माहिती फोनद्वारे कळविली. तथापि, त्यादरम्यान वाहनचालक श्री. नितीन देशमुख यांनी फोन न उचलल्याने श्रीमती सोनावणे या स्वत: श्रीमती रेणूका यांच्या घरी गेल्या व

श्रीमती रेणूका यांचे पती श्री. सचिन वाघमारे यांच्यासह गावातील काही महिलांना घेऊन चालत प्राथमिक आरोग्य केंद्राकडे जात असतांना रात्री १०.२२ वाजता प्रसूती वेदना तीव्र झाल्याने आरोग्य केंद्रात पोहोचण्यापूर्वीच केंद्रालगतच्या कम्पाऊंड लगत त्यांची प्रसूती झाली. त्यानंतर डॉ. करवंदे व दोन महिला आंतरवासिता यांनी प्रसूत माता व बालकावर उपचार केले. या दरम्यान वाहनचालक श्री. देशमुख रात्री १०.३० वाजता पोहचले तेव्हा ते मद्यधुंद असल्याची माहिती उपस्थितांनी दिली.

(३) हे अंशत: खरे आहे.

सदर इमारत धोकादायक नाही. तथापि, काही दुरुस्तीची आवश्यकता असल्याने इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरु आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रात एकूण १५ पदे मंजूर असून त्यापैकी ११ पदे भरलेली असून ४ पदे रिक्त आहेत.

(४) सदर प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी व अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करण्यांत आलेली असून याप्रकरणी प्राथमिक आरोग्य केंद्र, मोहिली येथील दोन्ही वैद्यकीय अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही सुरु आहे. तसेच वाहनचालक श्री.नितीन देखमुख यांना कार्यमुक्त करुन नवीन वाहनचालकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

भविष्यात याप्रकारच्या घटना घडू नये याकरिता जिल्ह्यातील सर्व वैद्यकीय अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी यांना सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रात ''रुग्ण कल्याण समिती'' कार्यरत नसल्याबाबत

**(४७) ७०७०१ (२८-०८-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानातील उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी आणि रुग्णालयांना येत असलेल्या अडचणी जलद गतीने दूर करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रासह शासकीय रुग्णालयात "रुग्ण कल्याण समितीची" स्थापना करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रात सदर समिती कार्यरत नाही तसेच अनेक ठिकाणी समिती गठीत असतांनाही समितीच्या नियमित बैठकाच होत नसल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने याबाबत कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२०-१०-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) चंद्रपूर जिल्हयात एकूण ६३ प्राथमिक आरोग्य केंद्र असून सर्व ठिकाणी रूग्ण कल्याण समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. चालू आर्थिक वर्षात माहे जून, २०२३ नियामक मंडळ सभा एकूण ६३, व कार्यकारी समिती एकूण ५६ सभा आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

(३) हे खरे आहे.

याबाबत रूग्ण कल्याण समिती अंतर्गत येणाऱ्या सर्व संस्थाना समिती सभा नियमित आयोजित करणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मानवत ( जि. परभणी ) तालुक्यात दिव्यांग व्यक्तींना प्रमाणपत्रासाठी विलंब होत असल्याबाबत

**(४८) ७०७५३ (२८-०८-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवत ( जि. परभणी) तालुक्यात दिव्यांग व्यक्तींना दिव्यांग प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांना तपासणीसाठी दिवसभर ग्रामीण रुग्णालयात थांबवले जात असल्याचे माहे जून, २०२३ च्या तिस-या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास

आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती होवून येथे येणा-या दिव्यांगाची तातडीने तपासणी करुन त्यांना प्रमाणपत्र उपलबध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१७-०१-२०२४) :**(१) हे खरे नाही.
(२) स्वावलंबन संगणक प्रणालीद्वारे युडीआयडी कार्ड व दिव्यांग प्रमाणपत्र वितरित करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात बांधकाम व्यावसायिकांची आणि सामान्य नागरिकांची माथाडीच्या नावाखाली लूट होत असल्याबाबत**

**(४९) ७०८४७ (२५-०८-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी):** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरा मध्ये माथाडी कामगारांच्या नावाखाली सामान्य नागरिक आणि बांधकाम व्यावसायिक यांची लूट होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकाम व्यवसाया अंतर्गत येणाऱ्या कामांना तसेच नागरिकांचे घर बदलत असतांना त्यांच्या संसार उपयोगी साहित्याचे शिफ्टिंग करतांना माथाडी कामगार कायदे लागू होतात काय,
(३) असल्यास, त्याची सविस्तर नियमावली काय आहे,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे, काय चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त माथाडीच्या नावाखाली बांधकाम व्यावसायिकांची आणि नागरिकांची लूट करणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (०९-०९-२०२४) :** (१), (२) व (३) सार्वजनिक वाहनांमध्ये घरदुरूस्तीचे साहित्य भरताना माथाडी अधिनियम १९६९ चे कलम २(९) अनुसूचीतील अनु.क्र.७ मध्ये सार्वजनिक वाहतुकीचा वाहनात माल भरणे किंवा त्यामधून तो उतरविणे व त्या कामाशी अनुषांगिक व संबंधित असेल असे इतर कोणतेही काम या संबंधातील नोकरी अशा स्वरूपाचा उल्लेख आहे. याकरीता ज्या सार्वजनिक वाहनामध्ये घर सामानाचे साहित्याचे कामकाज चालते त्या वाहनाचे मालकाने मंडळात मालक म्हणून नोंदणी घेणे आवश्यक आहे. तसेच अशा स्वरूपाची कामे करणाऱ्या कामगारांची नोंदणी मंडळात करणे आवश्यक आहे.
(४) माथाडी कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी करून त्यातील तरतुदींचा दुरूपयोग रोखण्यासाठी दिनांक ०६.०९.२०१६ च्या शासन निर्णयान्वये कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. संबंधित माथाडी मंडळ कार्यरत असलेल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कृती समित्या स्थापन केल्या आहेत. याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे बैठकांचे आयोजन करून त्या प्रश्नांवर आवश्यक कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे उदनवाडी (ता. सांगोला, जि. सोलापूर) गावातील मुख्य रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याबाबत**

**(५०) ७१५७८ (१५-०९-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे उदनवाडी (ता.सांगोला,जि.सोलापूर) गावातील महामार्गापासून ते दादासाहेब जगताप हायस्कूल,बाजार पटांगण ते महात्मा फुले सार्वजनिक वाचनालय,मायाक्का मंदिर ते डोंगरे डॉक्टरांचा दवाखाना,बाजार पटांगण ते राजाराम वलेकर

सर याच्या घरापर्यंत तसेच बाजार पटांगण ते शेख पिठाची चक्की पर्यंत येणारा रस्ता अशा मुख्य रस्त्यांना मोठे खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्याने ग्रामस्थांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,अद्याप शासनाकडून कोणतीच कार्यवाही होत नसल्याने दिवसेंदिवस उक्त रस्त्यांची दुरवस्था होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२३-०१-२०२४) :**(१), (२) व (३) अंशत: खरे आहे. महामार्ग ते दादासाहेब जगताप हायस्कुल हा रस्ता एकूण १ किमी लांबीचा ग्रामीण मार्ग दर्जाचा आहे. त्यापैकी ४१५.०० मी. लांबीची देखभाल दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असून उर्वरीत ५८५.०० मी. लांबी जिल्हा परिषद कार्यक्षेत्रात आहे. त्यानुसार सन २०२३-२४ मध्ये निधी उपलब्धतेनुसार रस्ते दुरुस्ती शक्य आहे.

मायाक्का मंदिर ते डोंगरे डॉक्टरांचा दवाखाना हा रस्ता प्रमुख जिल्हा मार्गाचा भाग असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यक्षेत्रात आहे.

उर्वरीत ३ रस्ते ग्रामपंचायत उदनवाडी कार्यक्षेत्रात असून बाजार पटांगण ते महात्मा फुले सार्वजनिक वाचनालय रस्ता दुरुस्ती पूर्ण होऊन रस्ता सुस्थितीत आहे. तसेच, बाजार पटांगण ते राजाराम वलेकर सर यांच्या घरापर्यंतचा रस्ता व बाजार पटांगण ते शेख पिठाची चक्की पर्यंत रस्ता ग्रामपंचायत उदनवाडी यांच्याकडील अनुदान उपलब्धतेनुसार करणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.